# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१६ – १७

## **साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमाला**



सकाळ
४

# नकार द्यायचा मुलींनाही पूर्ण अधिकार

## ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या हरियानाच्या रितू सा यांचे प्रतिपादन; राजगुरुनगरला व्याख्यान

राजगुरुनगर, ता. ३१ : आपले एखाद्यावर प्रेम असेल तर आपण त्या व्यक्तीवर क्रूर हल्ला कसा करू शकतो? बलात्कार कसा करू शकतो किंवा छळ कसा करू शकतो?, असा सवाल करीत खऱ्या प्रेमाचा अर्थ समजून घ्या, प्रेमाचा खरा अर्थ दुसऱ्याला आनंदी ठेवणे हा आहे आणि नकार द्यायचा अधिकार मुलींनाही असतो, ही मानसिकता समाजात रुजवा, असे आवाहन स्वतः ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या हरियानाच्या रितू सा यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बचेंगे तो और भी लडेंगे', या विषयावर त्या बोलत होत्या.

यावेळी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊशेठ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एस. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. डी. कुलकर्णी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

त्या पुढे म्हणाल्या की, "कोणत्याही व्यक्तीवर अन्याय, ... शिकताना किंवा दुर्दैवाने बळी झाल्यानंतर पुन्हा उभे राहण्यासाठी या समाज व्यवस्थेशी, समाजातील वाईट प्रवृत्तींशी वारंवार संघर्ष करावा लागतो. त्यामुळे संघर्षाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवून माणसाने सकारात्मक दृष्टी ठेवून प्रयत्नवादी राहायला हवे. मुलामुलींनी चेहऱ्यापेक्षा मन स्वच्छ ठेवून आपल्या कामातून सन्मान मिळवायला हवा."

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी केले, तर पाहुण्यांचा परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी करून दिला. आभार प्रदर्शन गौरी जोशी हिने केले.

राजगुरुनगर (ता. खेड) : साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बचेंगे तो और भी लडेंगे' या विषयावर बोलताना हरियानाच्या रितू सा.

### 'अपराध होताना पाहणाराही दोषीच'

अपराध करणारा जेवढा दोषी आहे, तेवढाच होत असताना ते पाहणारा व मदत न करणाराही दोषी आहे. माझ्यावर ॲसिड हल्ला होत असताना आजूबाजूच्या लोकांनी मला मदत केली नाही. माझा काही दोष नसताना माझे आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझ्यासारख्या दुर्दैवाच्या बळी ठरलेल्या समाजातील सर्व महिलांना पुन्हा उभे करणे ही आपली प्रत्येकाची राष्ट्रीय जबाबदारी असल्याचे रितू सा यांनी सांगितले.

# संघर्ष करताना सकारात्मक दृष्टी ठेवा

## हरियाणाची रितू सा यांचे आवाहन : राजगुरुनगर येथे व्याख्यान




राजगुरुनगर : ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या बोलताना रितू सा.



राजगुरुनगर : येथे बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बचेंगे तो और भी लडेंगे' या विषयावर मनोगत ऐकण्यासाठी जमलेल्या महिला.

राजगुरुनगर, दि. २९ (प्रतिनिधी) - कोणत्याही व्यक्तीला जगताना, शिकताना किंवा दुर्दैवाचा बळी झाल्यानंतर पुन्हा उभे राहण्यासाठी या समाजव्यवस्थेशी, समाजातील वाईट प्रवृत्तीशी वारंवार संघर्ष करावा लागतो. त्यामुळे संघर्षाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवून माणसाने सकारात्मक दृष्टी ठेवून प्रयत्नवादी राहायला हवे, असे आवाहन ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या हरियाणाच्या रितू सा यांनी राजगुरुनगर येथे केले.

येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत बचेंगे तो और भी लडेंगे या विषयावर त्या बोलत होत्या. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हिरामण सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. डी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. रितू सा म्हणाल्या, सकारात्मक विचारसरणीने कोणत्याही दुर्दैवी प्रसंगातून माणूस बाहेर पडू शकतो. आपली ओळख नावाऐवजी आपल्या कामातून झाली पाहिजे. मुलामुलींनी चेहऱ्यापेक्षा मन स्वच्छ ठेवून आपल्या कामातून सन्मान मिळवायला हवा. दुसऱ्याचा आदर करायला शिकायला हवे. प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार असून कोणाच्या भावनांशी खेळू नये. प्रेमाचा खरा अर्थ दुसऱ्यात आनंद देण्यात हा आहे. सा म्हणाल्या की, अन्याय करणारा जेवढा दोषी आहे, तेवढाच तो होत असताना ते पाहणारा व मदत न करणारा दोषी आहे. माझ्यावर ॲसिड हल्ला होत असताना आजूबाजूच्या लोकांनी मला मदत केली नाही. माझा काही दोष नसताना माझे आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझ्यासारख्या दुर्दैवाच्या बळी ठरलेल्या समाजातील सर्व महिलांना पुन्हा उभे करणे ही आपली प्रत्येकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केला. गोगी जोशी हिने आभार मानले.

### 'सा'च्या संवादामुळे उपस्थित हेलावले

ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या मुलींच्या कहाण्या सांगताना उपस्थितांच्या अंतःकरणात कालवाकालव झाली. सर्व उपस्थित अवाक्‌ झाले होते. त्या सर्व मुलींना त्यांच्या आग्रहास्तव एका स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून पुन्हा उभे केले जाते. त्यांना चांगले उपचार व आर्थिक मदत केली याबद्दल त्यांनी माहिती सांगितली. समाजातील वाईट प्रवृत्तीविरुद्ध सर्वांनी एकत्रित सामना करण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

पुण्य नगरी | 4 | मंगळवार, ३१ जानेवारी २०१७ | पुणे

# संघर्षाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवा

## रितू सा यांचे मत



राजगुरूनगर : प्रतिनिधी

दुर्दैवाचा बळी ठरल्यानंतर कोणत्याही व्यक्तीला पुन्हा उभे राहण्यासाठी समाजव्यवस्थेशी, समाजातील वाईट प्रवृत्तींशी वारंवार संघर्ष करावा लागतो. त्यामुळे संघर्षाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवून माणसाने सकारात्मक दृष्टी ठेवून प्रयत्नवादी राहायला हवे, असे आवाहन ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या हरियाणाच्या रितू सा यांनी येथे केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टे पाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बचेंगे तो और भी लडेंगे' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ विद्यार्थी उपस्थित होते.

रितू सा पुढे म्हणाल्या, सकारात्मक विचारसरणीने कोणत्याही दुर्दैवी प्रसंगातून माणूस बाहेर पडू शकतो. अपराध करणारा जेवढा दोषी आहे तेवढाच होत असताना ते पाहणारा व मदत न करणारा दोषी आहे. माझ्यावर ॲसिड हल्ला होत असताना आजूबाजूच्या लोकांनी मला मदत केली नाही. माझा काही दोष नसताना माझं आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझ्यासारख्या दुर्दैवाच्या बळी ठरलेल्या समाजातील सर्व महिलांना पुन्हा उभे करणे ही आपली प्रत्येकाची राष्ट्रीय जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी त्यांनी ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या मुलींच्या कहाण्या सांगताना उपस्थितांच्या अंतःकरणात हेलावले. समाजातील वाईट प्रवृत्तीविरुद्ध सर्वांनी एकत्रित सामना करावा, असे आवाहन रितू सा यांनी उपस्थितांना केले.

सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी तर परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी करून दिला. गौरी जोशी हिने आभार मानले.

१२ | केसरी | पुणे, १ फेब्रुवारी २०१७

# संघर्ष हा जीवनाचा अविभाज्य भाग : रितू सा

राजगुरूनगर, (वार्ताहर) : कोणत्याही व्यक्तीला जगताना, शिकताना किंवा दुर्दैवाचा बळी झाल्यानंतर पुन्हा उभे राहण्यासाठी या समाजव्यवस्थेशी, समाजातील वाईट प्रवृत्तींशी वारंवार संघर्ष करावा लागतो. त्यामुळे संघर्षाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवून माणसाने सकारात्मक दृष्टी ठेवून प्रयत्नवादी राहायला हवे, असे आवाहन स्वतः ॲसिड हल्ल्याची बळी ठरलेल्या हरियाणाच्या रितू सा यांनी केले.

येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बचेंगे तो और भी लडेंगे' या विषयावर त्या बोलत होत्या. याप्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी. कुलकर्णी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

रितू सा म्हणाल्या की, सकारात्मक विचारसरणीने कोणत्याही दुर्दैवी प्रसंगातून माणूस बाहेर पडू शकतो. आपली ओळख नावापेक्षा आपल्या कामातून झाली पाहिजे. मुलामुलींनी चेहऱ्यापेक्षा मन स्वच्छ ठेवून आपल्या कर्मातून सन्मान मिळवायला हवा. दुसऱ्याचा आदर करायला शिकायला हवं. प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार असून कोणाच्या भावनांशी खेळू नये. प्रेमाचा खरा अर्थ दुसऱ्याला आनंदी ठेवणे हा आहे. अ

पराध करणारा जेवढा दोषी आहे. तेवढाच होत असताना ते पाहणारा व मदत न करणारा दोषी आहे. माझ्यावर ॲसिड हल्ला होत असताना आजूबाजूच्या लोकांनी मला मदत केली नाही. माझा काही दोष नसताना माझं आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझ्यासारख्या दुर्दैवाच्या बळी ठरलेल्या समाजातील सर्व महिलांना पुन्हा उभे करणे, ही आपली प्रत्येकाची राष्ट्रीय जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुसे यांनी केले पाहुण्यांचा परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी तर आभार प्रदर्शन गौरी जोशी या विद्यार्थिनीने केले.



राजगुरूनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयातील व्याख्यानमालेत बोलताना हरियाणाच्या रितू सा (छायाचित्र : किरण खुडे, राजगुरूनगर)

संध्या | बुधवार, दि. १ फेब्रुवारी २०१७ | ६

# 'संघर्ष हा जीवनाचा अविभाज्य भाग असावा' : रितू सा



राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयातील व्याख्यानमालेत बोलताना हरियाणाच्या रितू सा. समोर उपस्थित जनसमुदाय. (छाया : किरण खुडे,राजगुरुनगर)

राजगुरुनगर (किरण खुडे) : कोणत्याही व्यक्तीला जगताना, शिकताना किंवा दुर्दैवाचा बळी झाल्यानंतर पुन्हा उभे राहण्यासाठी या समाजव्यवस्थेशी, समाजातील वाईट प्रवृत्तींशी वारंवार संघर्ष करावा लागतो. त्यामुळे संघर्षाला जीवनाचा अविभाज्य भाग बनवून, माणसाने सकारात्मक दृष्टी ठेवून, प्रयत्नवादी राहायला हवे असे आवाहन स्वतः ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या हरियाणाच्या रितू सा यांनी केले. येथील हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात आयोजित साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृती व्याख्यानमालेत 'बचेंगे तो और भी लढेंगे' या विषयावर त्या बोलत होत्या. या प्रसंगी खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाबासाहेब सांडभोर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य प्रा. एच. पी. जाधव, पर्यवेक्षक प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, प्रा. ए. जी कुलकर्णी, ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

'रितू सा' पुढे बोलताना म्हणाल्या की, सकारात्मक विचारसरणीने कोणत्याही दुर्दैवी प्रसंगातून माणूस बाहेर पडू शकतो. आपली ओळख नावापेक्षा आपल्या कामातून झाली पाहिजे. मुलामुलींनी चेहऱ्यापेक्षा मन स्वच्छ ठेवून आपल्या कामातून सन्मान मिळवायला हवा. दुसऱ्याचा आदर करायला शिकायला हवं. प्रत्येकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार असून कोणाच्या भावनांशी खेळू नये. प्रेमाचा खरा अर्थ दुसऱ्याला आनंदी ठेवणे हा आहे.

रितू सा म्हणाल्या की, अपराध करणारा जेवढा दोषी आहे तेवढाच होत असताना ते पाहणारा व मदत न करणारा दोषी आहे. माझ्यावर ॲसिड हल्ला होत असताना आजूबाजूंच्या लोकांनी मला मदत केली नाही. माझा काही दोष नसताना माझं आयुष्य उद्ध्वस्त झाले. माझ्यासारख्या दुर्दैवाच्या बळी ठरलेल्या समाजातील सर्व महिलांना पुन्हा उभे करणे ही आपली प्रत्येकाची राष्ट्रीय जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. या प्रसंगी त्यांनी ॲसिड हल्ल्याच्या बळी ठरलेल्या मुलींच्या कहाण्या सांगताना उपस्थितांच्या अंतःकरणात कालवाकालव झाली. सर्व अस्वस्थ झाले होते. त्या सर्व मुलींना त्यांच्या आग्रास्थित एका स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून पुन्हा उभे केले जाते. त्यांना चांगले उपचार व आर्थिक मदत केली, याबद्दल त्यांनी माहिती सांगितली. शेवटी समाजातील वाईट प्रवृत्तीविरुद्ध सर्वांनी एकत्रित सामना करण्याचे आवाहन उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बी. डी. अनुरे यांनी केले तर पाहुण्यांचा परिचय प्रा. शिल्पा टाकळकर यांनी केला. तर आभार प्रदर्शन कु. गौरी जोशी या विद्यार्थीनीने केले.

जनप्रवास | ५
शुक्रवार, दि. ३ फेब्रुवारी २०१७

# संघर्ष हा जीवनाचा अविभाज्य भाग असावा : रितू सा



डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख